सोलापूर महानगरपालिका

जा.क. / आ.अ / कु.क.भा.स /
आरोग्याधिकारी यांचे कार्यालय
दि. 06 / 06 / 2017

—: प्रेस नोट :—

सन 2014 सालापासून भारत पोलिओमुक्त झालेला असून गोवर, डांग्या खोकला, काविळ, मेंदूज्वर, क्षयरोग यासारखे आजारांचे लसीकरणाव्दारे समूळ उच्चाटन करणे हे आपल्यापुढील मोठे आवाहन आहे.

सोलापूर महानगरपालिका, आरोग्य खाते , कुटुंब कल्याण शहर संकलन कार्यालय अंतर्गत मा. शासनाच्या मिशन इंद्रधनुष्य योजनेच्या 4 टप्प्यातील तिस—या सत्रासाठी लसीकरणापासून वंचित किंवा अपूरे लसीकरण झालेल्या गरोदर माता व 0 ते 5 वयोगटातील बालकांसाठी विशेश मोहिम 7 जून ते 14 जून तसेच पुढील महिन्याच्या 7 जुलै ते 14 जुलै या कालावधीत राबविण्यात येत आहे.

इंद्रधनुष्यातील सात रंगाप्रमाणे सदरचा कार्यक्रम हा दरमहिन्याच्या 7 तारखेला 7 दिवसांसाठी व 7 प्रकारच्या लसी लाभार्थींस देण्यात येतील. या कार्यक्रमांतर्गत शहरी भागातील झोपडपट्टया, जोखीमग्रस्त भाग, बांधकामाच्या ठिकाणी, साखर कारखाने, वीट भट्टया तसेच स्थलांतरित जमातीतील गरोदर स्त्रीया तसेच 0 ते 5 वयोगटातील बालके यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. त्यानुसार महानगरपालिका अंतर्गत 19 आरोग्य केंद्रामार्फत विविध ठिकाणी लसीकरण सत्रे आयोजित करण्यात आलेली आहेत. या अंतर्गत पूर्ण लसीकरणापासून वंचित तसेच अपूरे लसीकरण झालेल्या 60 गरोदर स्त्रीया व 633 बालके यांचे लसीकरण प्रामुख्याने करण्यात येणार आहे.

तरी मा. आयुक्त, सो.म.पा. यांचेकडून नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपण आपल्या नजीकच्या महानगरपालिकेच्या लसीकरण केंद्रामध्ये जाऊन आपल्या गरोदर माता व 0 ते 5 वयोगटातील बालकांना लसीकरणाव्दारे संरक्षित करुन घ्यावे.

आरोग्याधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर